दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २६ जूले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये



गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *

समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे

दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक

मो.न.9422660077


# संघर्ष योध्याची सिंहगर्जना मी दिलेल्या उमेदवाराला समाजाने मतदान करा, दगड असेल तरी निवडून द्या- जरांगे पाटिल



**वादळवार्ता-विशेष**

मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा टिका केलीय. तसेच विधानसभा निवडणुकीत मी दिलेल्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन समाजाला दिलंय. गेली १३ , १४ वर्ष काही झाले नाही मग माझ्यावरच आता कारवाई का? मी गोर गरिबांसाठी लढतोय म्हणून? पुण्यात जाऊन मी जमीन घेऊन आलो, आता नोटीस नाही, डायरेक्ट वॉरंट, का घडवून आणतात हे? असे प्रश्न त्यांनी फडणवीसांना विचारले. मला बदनाम करण्यासाठी हे चाललंय. मला आधीही कुठलीही नोटीस आली नाही. हे फडणवीस साहेबांना शोभत नाही. आमचे अभियान बदनाम करू नका. तुम्ही गोडी गुलाबीने हाताळले तर तुमच्या अंगलट येणार नाही, असे ते म्हणाले. उपोषण सुरू असताना तिथं बसून काम होत नव्हतं आता इथं बसून काम होईल, मी कामाला लागलोय.. सरकार ऐकायला तयार नाही, लोक ऐकत नाही, मी या आधीही सलाइन काढून टाकले पण वेळ जातो आणि काम करायचं होतं. सरकारवर विश्वास नाही असा शब्द मी वापरणार नाही आणि नवी डेडलाईन त्यांनी मागितली होती म्हणून १३ ऑगस्ट पर्यंत वेळ दिल्याचे जरांगे म्हणाले. मी रात्री बरेच उमेदवार निवडले निवडणुकीचा काम सुरू केल्याचे जरांगेंनी सांगितले.

## फडणवीस रोषाचे धनी होतायत, अशी टिका त्यांनी केली. दगड असेल तरी निवडून द्या

फडणवीस साहेब आमच्या आई बहिणीला बोलले, आम्ही सहन करायचं का?सरकार सोबत आता शून्य संपर्क आहे. जोवर सहन होतंय तोपर्यंत करू आणि नंतर सगळं बाहेर काढू, असे ते म्हणाले. ७ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट पाऊस असू द्या, पूर असू द्या माता माऊली रस्त्यावर दिसेल, असे जरांगे म्हणाले. सगळ्या धर्माचे, शेतकऱ्यांपासून डॉक्टरांपर्यंत सगळे आपले उमेदवार असतील. मी उमेदवार देईल त्याला फक्त समाजाने मतदान करावे. दगड असेल तरी निवडून द्या. त्याच्याकडून काम मी करून घेईल, असे आवाहन जरांगेंनी समाजाला केले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी मला बोलावले नाही. भुजबळांना बोलावले. हा ज्याचा त्याचा प्रश्न आम्ही आमचे काम करत जाणार, असे जरांगेंनी सांगितले.

## पवारांनी थेट बोलावे

**पवार आणि मुख्यमंत्र्यांच्या भेटीवर जरांगेंनी भाष्य केले. शरद पवार आमच्या बाजूने काही बोलले असतील हे वाटत नाही आणि बोलले असतील तर थेट बोलावे ना , काय लपवायच? असा प्रश्न त्यांनी विचारला. १९ ऑगस्टला मराठा समाजाचे बैठक बोलावून सगळं जाहीर करणार आहे. आमची बाजू मांडणारा जो कुणी असेल त्यांना निवडून आणणार असल्याचे ते म्हणाले.**

## ‘मला ट्रॅप केले जातंय’


**येवल्याच्या गेंड्याला काही फरक पडत नाहीय.प्रसाद लाड बोलतायत पण फडणवीस त्यांना थांबवत नाहीत. हे मागच्या दारावरील आमदार आहेत.दरेकरांच्या चकाट्या ऐकायला वेळ नाही.आपले गोरगरीब फडणवीस साहेबांच्या टेबलाजवळ बसवायचे. पण ते उत्तर देत नाहीत. माझ्यावर टीका हा त्यांच्या अभियानाचा भाग आहे. राणे साहेबांवर मी उत्तर दिलं नाही. त्यांनी अंगावर घेऊ नये ही विनंती आहे.माझा पट्टा तुटला तर मग कठीण होईल, निलेश, नितेश यांनी समजून सांगावे. बाकीच्यांना फडणवीस साहेबानी अभियान राबवायला सांगितलं आहे ते राबवताय. आम्ही विश्वास टाकलाय ठरलेलं द्या, पण हे बिलिंदर लोकमध्ये टाकतायत. मला ट्रॅप केले जातंय, सत्ता फडणवीस साहेब चालवतायत. यामुळे भाजप वाटोळं होतंय,**




# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत जिल्ह्यातील युवकांना शासकीय निमशासकीय तसेच खासगी कार्यालयात रोजगारची संधी

## शैक्षणिक अर्हतेनुसार दिले जाईल विद्यावेतन

प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार शासनामार्फत विद्या वेतन दिले जाईल. अंतर्गत बारावी पास प्रशिक्षणार्थींना 6000/- रुपये प्रतिमाह, आयटीआय पदविका अशा प्रशिक्षणार्थींना 8000/- रुपये प्रतिमाह दिला जाईल. पदवीधर आणि पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना 10,000/- रुपये महिना प्रतिमाह दिला जाईल. बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवार यांनी उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड सुनील उचले यांच्याकडून करण्यात आले आहे.



बीड, 24: मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण या नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील युवकांना शासकीय निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयात रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. ही योजना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे राबवली जाणार आहे. यासंदर्भात बुधवारी सायंकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाची प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना वर्ष 2024 25 या आर्थिक वर्षापासून सुरू करण्याची मान्यता देण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या. https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमता वाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल यासाठी इच्छुक उमेदवार आणि प्रशिक्षण देऊ इच्छिणारे उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर नोंदणी करावी. या योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना/ उद्योजकांकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या 10 % टक्के व सेवा क्षेत्रासाठी 20% उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय निमशासकीय या आस्थापना उद्योग महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या 5 % टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. मात्र आस्थापना उद्योग यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाची माहिती अचूक दर्शविणे आवश्यक आहे. तसे न केल्यास प्राधिकृत अधिकारी हे शिक्षेस पात्र राहतील. 20 रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्य प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र राहतील.

## राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्हाध्यक्ष प्रा. अण्णासाहेब मतकर यांची पक्षनिरीक्षक पदी निवड ...

## गेवराई विधानसभा निवडणूक रासप स्वबळावर लढवणार

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळ आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रीय समाज पक्षाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत बीड जिल्हा अध्यक्ष प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांची गेवराई विधानसभा निरीक्षक पदी निवड करण्यात आली आहे



रासप चे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय महादेवजी जानकर साहेब यांच्या आदेशानुसार गेवराई मतदार संघाची चाचणी करण्यासाठी पक्ष निरीक्षक म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते व मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर यांच्या उपस्थितीत राज्यातील जिल्हास्तरीय प्रमुख पदाधिकारी मुंबईत बैठक पार पडली आहे या बैठकीत रासपचे बीड जिल्हा अध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांच्या राजकीय दृष्ट्या सामाजिक दृष्ट्या बहुचर्चित असलेल्या गेवराई मतदार संघात पक्षनिरीक्षक म्हणून पक्षाकडून पत्रकाद्वारे नियुक्ती करण्यात आली राष्ट्रीय समाज पक्षाकडून महाराष्ट्रातील 109 विधानसभा मतदारसंघात चाचणी करण्यात आली यामध्ये गेवराई मतदार संघाचा देखील समावेश आहे या सर्व विधानसभा मतदारसंघात बहुजन समाजासोबत घेऊन ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे बीड जिल्हा अध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी सांगितले गेवराई मतदार संघाच्या पक्ष निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

# परळी सिरसाळा वाहनचालकाची फरफट चिखलमय रस्ता व पाण्यातून करावा लागतो प्रवास

**परळी/प्रतिनिधी** राष्ट्रीय महामार्ग बीड परळी या रस्त्याचे काम अत्यंत दर्जाहीन व धिम्या गतीने होत आहे.काम पूर्ण केव्हा होणार असा सवाल वाहचालक करत आहेत सम्पूर्ण उन्हाळा धुळीमुळे त्रस्त झालेले प्रवासी याच महामार्गावर काही ठिकाणी कामाला सुरुवात नसल्याचे दिसून येत आहे. मुरुम भराव ज्या ठिकाणी पाहिजे त्या ठिकाणी नाही आता पावसाळा सुरु आहे या कामात कुठे चढ कुठे खड्डा, कुठे उतार चढाव अशी स्थिती असून एकदाच काम सुरू करून वाहन चालकांना त्रासून टाकले आहे या कामावर कुठेच डायव्हर्शन दिसत नाही सध्या पावसाळ्याचे दिवस चालू आहेत नोकरदार प्रवासी आपल्या ऑफिस कामाला यायचे झाल्यास पांढरेशुभ्र कपडे घालून येत असतात या मंडळींना घरी परतताना काळे पांढरे होऊन चिखलमय व्हावे लागत आहे या मार्गावर नळकांडी बनवली आहे तेथे पूर्ण पणे मुरूम भराव नाही परिणामी पावसाळ्यात हा मार्ग वाहनचालक व प्रवाशांना डोकेदुखी ठरणार आहे कामाला सुरुवात झाली. तेव्हापासूनच काम दर्जाहीन होत असल्याची ओरड सुरू झाली मात्र संबंधितांना काम करून घ्यायची घाई झाली अन् एकसाईड पूर्ण केल्यानंतर दुसरी साईड खोदण्याची गरज असताना दोन्ही साईड खोदून काढल्या गेल्या एक साईड काम केले त्यासाईडला मुरूम भरावं कोणी दोन वाहने आल्यास प्रचंड अडथळा निर्माण होत आहे ही चिंतेची बाब आहे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी व कर्मचारी कामावर हजर नसतात त्यामुळे कामाची वाईट परिस्थिती दिसून येत आहे. या कामावर वळण मार्ग किंवा काम सुरु असल्याचे फलक न लावल्याने रेडियमच्या फलकाअभावी रात्रीला काम



कुठे सुरू आहे कुठं वळण आहे हे समजत नसल्याने वाहनधारक गोंधळात पडत आहेत अपघात होण्याची शक्यता नकारता येत नाही. कामाला गती देण्याबाबत संबंधितांना वारंवार बोलूनही कामाला अजिबात गती नाही व कामास दर्जा नाही हा महामार्ग पूर्णत्वास केव्हा जाणार? असा सवाल या मार्गाने प्रवास करणारे प्रवासी व वाहनचालक विचारत करत आहेत छोटे- मोठे पुलाच्या कामाला तर अद्याप सुरुवात झाली आहे .बाजूला वळण दिले आहे तिथे पाणी साठा चिखलात फरफट होत असून कार दुचाकी या रोड सोडून बाजूला सरकत जात आहेत याबाबत पाऊस काळात कामाला गती देण्याची गरज असून त्यातल्या त्यात कामात धरसोड पद्धतीने होणा-या कामामुळे या रस्त्याने प्रवास करणारे प्रवासी व वाहनचालक कंटाळवाणे झाले आहेत. अक्षरस: पाण्यातून गाडी चालवावी लागत असून त्यात खड्डा मोठा आहे कि लहान समजत नसून डोळे बंद करून गाडी चालवल्यावर गाडी पलटी होईल का खड्ड्यात फसेल या सारखा भास होत आहे तात्काळ खड्डे असतील तेथे मुरूम भरून घेऊन वाहतूक सुरळीत करणं गरजेचं आहे.

## लव्हूरी केंद्राची शिक्षण परिषद संपन्न-केंद्रे.

**येवता/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लव्हूरी केंद्राची केंद्रस्तीय बैठक माध्यमिक शाळा येवता येथे दुपारी १२:३०ते ०४: ३० वा. आयोजीत करण्यात आली बैठकीस प्रमुख मार्गदर्शन जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,



सुनिलराव केंद्र यांनी लव्हूरी केंद्रातील जि.प.प्रा.४२ शाळेचे मुख्याधापक व १०४ शिक्षक बैठकीस उपस्थित होते.

केंद्रे म्हणाले की विधार्थ्याची शैक्षणिक गुणत्ता वाढविण्याची सर्व शिक्षकांडून अपेक्षा केली शाळेत पूर्णवेळ उपस्थित राहावे शिक्षकांच्या आलेल्या किरकोळ रजा तात्काळ मान्य करून त्याची माहिती सादर करण्याची सुचना केंद्रीय मुख्याधापक केली, सर्व शिक्षकांची स्वतःउपस्थीती घेतली. मराठी,गणित व इग्रजी या विषयाची अध्यय निषपत्ती,शाळा व्यवस्थापन समिती व इत्यादी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले,प्रस्थाविक केंद्रप्रमुख राधाकृष्ण कांबळे यांनी केले सुत्रसंचलन विक्रम डोईफडे यांनी केले.

## चेतना महाविद्यालय बांद्रा (पूर्व) येथे विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

मुंबई : चेतना जूनियर कला आणि वाणिज्य महाविद्यालय बांद्रा पूर्व येथे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई उपनगर जिल्हा संघटक सौ दिशा कळंबे यांनी १२ वीच्या विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती मार्गदर्शन केले व्यसनामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम व अंमली पदार्थांच्या सेवन केल्याने मानवी शरीर व मेंदूवर अनिष्ट परिणाम होतात. बदलत्या जीवनशैलीमुळे आजची युवा पिढी अंमली पदार्थासह इतर व्यसनांच्या आहारी जात आहे.त्यामुळे युवकांची शारीरिक मानहानी होत आहे यावेळी महाविद्यालयाचे शिक्षक श्री. गजानन डोंगरे, संभाजी भांड, अलका पेदाम, संपदा पाटील,दिपिका हेगडे, रचना विश्वकर्मा,सतिश ठाकरे, संतोष माने इत्यादी उपस्थित होते. व्यसनमुक्तीचे शपथ घेऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

## उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा ऑनलाईन वेबिनार श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात संपन्न

माजलगाव -येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या द्वारे आयोजित 'शिक्षण सर्वांसाठी समृद्ध महाराष्ट्रासाठी 'या ऑनलाईन वेबिनार मध्ये उच्च तंत्र शिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांत पाटील यांनी विद्यार्थी -शिक्षक -संस्था पदाधिकारी असा संवाद साधला आहे.





महाविद्यालयाच्या भारत माता सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी भा. शि. प्र. संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड,महाविद्यालय अर्थ समिती प्रमुख एकनाथ जाधव,प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, प्रा. अंकुश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या आभासी संवादामध्ये मा. चंद्रकांत पाटील यांनी उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला मुलींसाठी विविध स्तरावर असणाऱ्या योजनां चे मार्गदर्शन केले. या ऑनलाईन वेबिनार मध्ये बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनीही सहभाग घेतला होता. राज्यभरातून अनेक विदयार्थ्यांनी या ऑनलाईन वेबिनार प्रक्रियेतुन शासनाच्या विविध योजनाबद्दल प्रश्न विचारत कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयाचे बहुसंख्य प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी या वेबिनार प्रसंगी उपस्थित होते.




बीड - माजी मंत्री महाराष्ट्र राज्य, मा.प्रा लक्ष्मणजी ढोबळे साहेब. यांच्या विचारावर प्रेरित होऊन, लातूर येथे संवाद मेळावा अभियान दौरा चालू असताना अॅड. कोमलताई साळुंखे - ढोबळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज विनोद दादा हातागळे. यांची. बिड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी. आशोक जाधव, प्रदेश उपाध्यक्ष बहुजन रयत परिषद व समाजातील सर्व मान्यवर उपस्थित होते.

# शासनाकडून बी.टेक.फूड टेक्नॉलॉजी आणि बी.एस्सी. ॲग्रीसह इतर कृषी विषयक अभ्यासक्रमांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास २८ जुलै पर्यंत मुदतवाढ

## विद्यार्थ्यांनी त्वरित के एस के कृषि महाविद्यालयात संपर्क करावा.

बीड/**प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या कृषि विषयक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ४ जुलै पासून चालू असून 22 जुलैपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश फॉर्म भरण्यास कागदपत्रांची पूर्तता न करता आल्यामुळे तसेच ग्रामीण भागातील इतर काही अडचणींमुळे या अभ्याक्रमासाठी इच्छूक अनेक विद्यार्थ्यांना या विषयाच्या प्रवेशासाठी संधी मिळावी यासाठी सौ.के. एस.के. (काकू) अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालयाचे सहसचिव डॉ.जी.व्ही साळुंके यांनी २३ जुलै रोजी औरंगाबाद येथे झालेल्या सी.ई. टी.सेल आणि प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मिटिंग मध्ये मा. अध्यक्ष यांच्याकडे या संदर्भात विद्यार्थ्यांना प्रवेश फॉर्म भरण्यास येणाऱ्या अडचणींची माहिती देवून प्रवेश फॉर्म भरण्यास मुदतवाढ मिळण्याबद्दलची मागणी केल्यानुसार २८ जुलैपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. सर्व पालक आणि विद्यार्थ्यांना नम्र निवेदन करण्यात येते कि, १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी इतर अभ्यासक्रमाच्या (उदा. फार्मसी, नर्सिंग, मेडिकल, इंजिनिअरिंग, कॉम्पुटर सायन्स) प्रवेशासाठी फॉर्म भरला असल्यास त्यांनीही या अभ्यासक्रमाचा फॉर्म भरावा कारण, जर विद्यार्थ्याला इतर अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला नाही तर या शिक्षणाची संधी मिळण्यासाठी फॉर्म भरणे आवश्यक आहे. १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्रज्ञान आणि कृषि शिक्षणाचे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगली संधी प्राप्त झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ संलग्न असलेल्या "अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी त्वरित यावे किंवा आपल्या जवळच्या नेट कॅफेवर जावून त्वरित या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरून घ्यावा. ज्या विद्यार्थ्यांना या संदर्भात अडचणी किंवा शंका असतील त्यांनी या महाविद्यालयाशी संपर्क करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांनी सागर हाईट्स, बस स्टॅन्ड समोर, बीड येथे यावे, याठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा विनामुल्य (मोफत) उपलब्ध आहेत, तरी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेवून प्रवेशासाठी त्वरित संपर्क साधावा आणि प्रवेश घ्यावा असे महाविद्यालयातर्फे आवाहन करण्यात येत आहे. संपर्कासाठी फोन नं.: ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४.

# प्रकाश अण्णा शेंडगे यांनी परळीतून फुंकले विधानसभेचे रणसिंग

## ओबीसी बहुजन पार्टी विधानसभेत किंगमेकरच्या भूमिकेत राहणार - प्रा.टी.पी.मुंडे

## मराठवाडा विभागाचा प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न; मेळाव्यात ओबीसी बांधवांची लक्षणीय उपस्थिती!

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या विधानसभा विधानसभा नवडणुकीत ओबीसी बहुजन पार्टीचे 288 जागेवर उमेदवार उभे करणार असल्याचे रणसिंग परळीतून ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे यांनी फुंकले तर विधानसभा निवडणुकीत ओबीसी बहुजन पार्टी ही किंग मेकर च्या भूमिकेमध्ये असेल असे प्रतिपादन पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. टी.पी.मुंडे सर यांनी केले. परळीत आयोजित केलेल्या मराठवाडा विभागाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

परळी येथील श्रद्धा मंगल कार्यालय येथे ओबीसी बहुजन पार्टीच्या वतीने आयोजित मराठवाडा विभागाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात मराठवाड्यातील आठ ओबीसी बांधवांची तसेच प्रतिनिधींची लक्षणीय उपस्थिती होती. या मेळाव्यात अनेक पदाधिकाऱ्यांनी आपली मते व्यक्त केली. हा मेळावा सकाळ व दुपार अशा दोन सत्रात संपन्न झाला. मेळाव्यात सुरुवातीला महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या मेळाव्यात ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे यांनी अनेक विषयावर भाष्य केले येणारी विधानसभा ही ओबीसी विरुद्ध मराठा अशी होईल. महाराष्ट्रामध्ये मराठा समाज आठ ते बारा टक्के एवढा आहे त्या तुलनेने ओबीसी समाज 60 ते 65 टक्के आहे त्यामुळे ओबीसींनी एकत्र येण्याची गरज आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये समाजात भांडणे लावण्याचा प्रकार सुरू असून हा प्रकार निंदनीय आहे तसेच जरांगे यांनी पाडापाडीची भाषा करू नये असेही त्यांनी म्हटले. छोट्या ओबीसींना सोबत घेऊन यापुढे पक्ष वाटचाल करणार असल्याचेही ते म्हणाले.

पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सरांनी बोलताना म्हटले की, सरकारकडून ओबीसी आरक्षण संपुष्टात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत मात्र ते आपण होऊ देणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली तसेच मराठा समाजाला आपला विरोध नाही गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे परंतु ओबीसी मधून नको अशी परखड मत त्यांनी व्यक्त केले. मराठा समाजाला केंद्र व राज्याचे मिळून 18% आरक्षण आहे असे असताना ओबीसीचे आरक्षण कशासाठी मागता असा सवाल त्यांनी केला आहे. त्याचबरोबर मराठवाड्यामध्ये पक्ष बांधणीवर भर देणारा असून ओबीसींनी एकत्र येण्याची गरज आहे. येणाऱ्या विधानसभा



निवडणुकीमध्ये ओबीसी बहुजन पार्टीची भूमिका ही किंग मेकरची असेल. ओबीसी समाजातील अठरापगड जातीतील बांधवांनी एकत्र आल्यास महाराष्ट्रात क्रांती घडेल तसेच मुस्लिम दलित आणि छोटे ओबीसी बांधव यांना एकत्र करण्याचे ध्येय पक्षाचे आहे. महाराष्ट्रात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर असून त्यांना सुद्धा निवडणुकीमध्ये प्रतिनिधित्व देण्यात येईल. पदाधिकाऱ्यांनी आपले पक्ष संघटन गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत व त्यापुढे विभाग आणि महाराष्ट्र पोहोचवण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली पाहिजे.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे, उपाध्यक्ष प्रा.टी.पी. मुंडे सर यांच्या हस्ते निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले तसेच मधुकर तुकाराम मुंडे यांचा ओबीसी नेत्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश संपन्न झाला. यावेळी कार्यकारणी सदस्य हरिभाऊ मामा शेळके,अँड. मंगेश जी ससाने, रफिक भाई कुरेशी,राज्य संघटक पांडुरंग मेरगळ, माधव दादा मोराळे,मराठवाडा उत्तर विभागाचे अध्यक्ष डॉ. तानाजी भोजने, दक्षिण मराठवाडा विभागाचे अध्यक्ष भीमराव मुंडे, हरिभाऊ गायकवाड, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष सचिन शेंडगे, अरुणजी जाधवर, सय्यद साहेब, यशवंत अण्णा गायके, भीमराव सातपुते, मंचकराव ढोणे, अर्जुन सलगर, उमेश मोराळे, गोपाळ तांदळे, विलास ताटे, ओमप्रकाश सारडा, आप्पाराव महाराज पांढरे, शंकर नागरगोजे, निळकंठ गडदे, लक्ष्मण वंगे, अफजलभाई, ओबीसी बहुजन पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अँड.रवी शिंदे, पडीले साहेब, संभाजी शुळ साहेब, बालाजी शिंगे, परळी तालुका अध्यक्ष सूर्यकांत मुंडे, जि प सदस्य प्रदीप भैय्या मुंडे, विलास ताटे, राहुल कांदे, श्याम गडेकर, छत्रपती कावळे,आदीसह ओबीसी बांधव पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पक्षाचे जिल्हाध्यक्ष विनायक गडदे, सूत्रसंचालन प्रा.संदीपान मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन ओबीसी युवा नेते प्रा.विजय मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

## तीर्थक्षेत्रासाठी उपोषणकर्ते रोहन गलांडे यांची तब्येत बिघडली ! सार्वजनिक बांधकाम विभागाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष !

**केज/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात करण्यात यावी म्हणून रोहन गलांडे पाटील यांचे अमरण उपोषन दोन दिवस झाले सुरू केले आहे व आज उपोषणाचा तीसरा दीवस असुन उपोषणकर्ते रोहन गलांडे पाटील यांची तब्येत बिघडली आहे त्यांना अशकता पना आलेला असुन छातीत जळजळ होते आहे डोके जाम होत आहे त्यामुळे रोहन गलांडे पाटील यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजले जाते आहे.परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग केज उपोषणा कडे कानाडोळा आहे कारण दोन दिवसा पुर्वी ५० लाख निधीच्या विकास कामास सुरुवात केली आहे असे




सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक महिन्या पुर्वीचे पत्र असुन कार्यक्षेत्रात काहीच काम केलेले नाही तसेच रोहन गलांडे पाटील यांनी काल २४/०७/२०२४ रोजी अमरण उपोषन सुरू केले व आता सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम सुरू केल्याचा देखावा करुन रोहन गलांडे पाटील यांचे अमरण उपोषन मोडीत काढून तीर्थक्षेत्र विकास कामाचा निधी हडपण्याचा डाव सार्वजनिक बांधकाम विभाचा आहे का असा प्रश्न रोहन गलांडे यांना पडला आहे कारण ५० लाख निधीच्या कामाला वीस तीस हजाराची अर्धवट सामग्री कार्यक्षेत्रात उपोषणाला सुरुवात केली दाखवायची व उपोषण बंद करून काम बंद करायचे व नंतर त्या कामाकडे दुर्लक्ष करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करीत असुन जर असे होत राहनार असेल तर माझे पन अमरण सुरुच राहणार आहे जर उपोषणा दरम्यान मी मेलो तर प्रशासनान व सार्वजनिक बांधकाम विभाग केज व अंबाजोगाई जबाबदार राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ तालुका अध्यक्ष रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

## न्हावा गावातील महिला पदाधिकाऱ्यांची काँग्रेसमध्ये घरवापसी !

### जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी केले स्वागत.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

विधानसभेच्या निवडणूकीचे वारे वाहू लागले आहेत. लोकसभेच्या निवडणुकीमधे देशात व राज्यात काँग्रेस पक्षाने मुसंडी मारल्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याने विविध पक्षातील महिला व युवक कार्यकर्ते काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. न्हावा गावातील शेकापक्षाच्या नेत्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून न्हावा महिला मंडळाच्या लढाऊ नेत्या श्रीमती. शांताबाई म्हात्रे श्रीमती. रमाबाई पाटील, निर्मलाताई ठाकूर यांनी



आज काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेत्तृवाखाली काँग्रेस पक्षामधे प्रवेश केला. यावेळी जेष्ठ काँग्रेस नेते किसन पाटील, न्हावा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शैलेश म्हात्रे,राजेश म्हात्रे व इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. काँग्रेस पक्ष नेहमीच महिलांना व युवकांना पक्ष संघटनेत सन्मान देत असतो आपलाहि या पक्षामध्ये सन्मान राखला जाईल असे आश्वासन या प्रसंगी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी दिले. व स्वगृही परत आल्या बद्दल त्यांचे मनापासून स्वागत केले.

# जिल्हाधिकाऱ्यांना चार दिवस झाले आमरण उपोषण करणाऱ्या आंदोलनकर्त्यांचं उपोषण सोडायला वेळ नाही

## मोबाईल ही स्विच ऑफ-पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

**बीड/प्रतिनिधी**




ताल्काळ बेकायदेशीर रित्या जाणून-बुजून आपल्या पदाचा गैरवापर करणाऱ्या अनुसूचित जातीतील व्यक्तींना टार्गेट करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. " एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना बीड-१. यांच्यामार्फत सन २०२३ रोजी अंगणवाडी सेविका मदतनीस रिक्त पद भरती करण्यात आली. त्यामध्ये घाटसावळी येथील अंगणवाडी मदतनीस रिक्त पद भरती मध्ये बनावट कागदपत्र घेऊन, प्राथमिक यादीमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे जास्तीचे गुण देऊन उमेदवारास प्रथम क्रमांक देऊन, सिद्धी दादाभाई सूर्यवंशी यांची फसवणूक केलेली असून शासनाची देखील फसवणूक केलेली आहे. बनावट कागदपत्रा बाबत संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी सिद्धी दादाभाई सूर्यवंशी यांनी माहिती देऊन योग्य ती कारवाई करण्याबाबत विनंती अर्ज तक्रार केलेले आहे. तरी देखील संबंधित अधिकाऱ्यांनी त्याविषयी कोणत्याही प्रकारची योग्य ती कारवाई न करून पद भरती स्थगित ठेवली आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्याची आर्थिक देवाणघेवाण झाली असावी, याची शक्यता नाकारता येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज करण्यात आला असता, अर्ज घेण्यास नकार देण्यात आला. व अपमानास्पद वागणूक दिली. पंचायत समिती बीड आवकजावक मधून माहिती अधिकाराचा अर्ज दाखल केला असता. हे त्यांना कळाले तेव्हा प्राथमिक यादी मधील प्रथम क्रमांकाच्या उमेदवाराला आमच्याबद्दल माहिती दिली. त्यामुळे उमेदवाराच्या पतीने आम्हाला घरी येऊन माहिती अधिकार मागे घेण्याची धमकी दिली व रस्त्यात गाड्या आडव्या लावून मारण्याचाही प्रयत्न केला दिपक तांगडे यांच्या जीवास धोका असून काही बरे वाईट झाल्यास याला पूर्णतः जबाबदार बाल विकास प्रकल्प अधिकारी असतील. त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून शासनाची देखील फसवणूक केलेली आहे. ही बाब त्यांच्या वरिष्ठ अधिकारी म्हणजेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्याही निदर्शनास आणून दिली. त्यांनीही या विषयांमध्ये दुर्लक्ष करून दिशाभूल करून कोणत्याही प्रकारे योग्य न्याय देण्यास प्रयत्न केला नाही. त्यांची देखील आर्थिक देवाणघेवाण झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

घाटजवळा अंगणवाडी सेविकेला बेकायदेशीर रित्या कोणत्याही प्रकारचा कायदेशीर राजीनामा देण्यात आलेला नसून, देखील बालविकास प्रकल्प अधिकारी व संबंधित गावातील सरपंच,ग्रामसेवक व प्रतिष्ठित ग्रामपंचायतील ठेकेदारांनी मिळून आर्थिक पैशाची देवाणघेवाण करून जातीय द्वेषाने टार्गेट केले व अंगणवाडी सेविकेला कामावरून कमी केले. कारण १४ वित्त व १५ वित्त आयोगानुसार ग्रामपंचायत मध्ये जो निधी येतो. त्या निधीमधून काही टक्के भाग हा अंगणवाडी साठी खर्च करणे गरजेचे असते आणि घाटजवळा अंगणवाडी मध्ये कुठल्याच प्रकारची सोयी उपलब्ध नसल्यामुळे ई ग्राम स्वराज पोर्टलवर पाहणी केली. अंगणवाडीसाठी पैसे खर्च केले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे क्रांती शिंदे या अंगणवाडी सेविकेने सरपंच व ग्रामसेवक यांना विनंती करून अंगणवाडी साठी निधी खर्च करावा सांगितले, असता सरपंच व ग्रामसेवकांनी त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून अंगणवाडी सेविकेने वेळोवेळी तक्रार करून अंगणवाडीमध्ये रंगरंगोटी करून घेतली,लाईट फिटिंग करून घेतली,टीव्ही बसून घेतला, टेबल खुर्च्या आणण्यात आल्या व अंगणवाडीसाठी शौचालयाची मागणी केली. सेविका अनुसूचित जातीतील महिला असल्यामुळे तिला त्यांनी सन्मानाची वागणूक दिली नाही व शौचालय बांधण्यात टाळाटाळ केली. कोणत्याही प्रकारचा विनंती अर्ज सरपंच व ग्रामसेवक घेत नाहीत. सरपंच घुमरे, ग्रामसेवक घुमरे, ग्रामपंचायतील काम करणारा ठेकेदारही घुमरे यांची भावकी असल्यामुळे ग्रामसेवक मागील दहा वर्षापासून घाटजवळा ग्रामपंचायत मध्ये कार्यरत आहे.

१.बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी परिवेक्षिकामार्फत लेक लाडकी योजनेसाठी प्रत्येक फॉर्म मागे शंभर रुपयाची मागणी केली. प्रत्येक फॉर्म मागे शंभर रुपये न दिल्यामुळे. एकही फॉर्म घेण्यात आलेला नाही.

२.त्यांनी सांगितलेल्या शाखेमध्ये अकाउंट ओपन न केल्यामुळे काही वेळेस मानधन व जळतनासाठी येणारे पैसे अकाउंट वर ट्रान्सफर न करता चेक द्वारे देण्यात येते. जळतानाचे २०% रक्कम ही परिवेक्षिका मागणी करतात २०% रक्कम आपण देत नाही.

३.जुने मोबाईल घेऊन नवीन मोबाईल देण्यात आले. नवीन मोबाईलची पावती पोहोच आमच्याकडून घेण्यात आली त्यामुळे अंगणवाडी कार्यकर्तीने देखील जुन्या मोबाईलची पोच मागितली असता ती देण्यात आलेली नाही.

४.बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी अंगणवाडी सेविकांना हलक्या प्रतीच्या जबरदस्तीने साड्या घेण्यास भाग पाडले व त्यासाठी १६०० रुपयाची जबरदस्तीने वसुली केली ती साडी घेण्यास सेविकेने नकार दिला व सोळाशे रुपये देण्यासही नकार दिला. याविषयी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार याची माहिती मागविले असता बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी माहिती अधिकार घेण्यास नकार दिला. याचा राग मनात ठेवून सरपंच, ग्रामसेवक,ग्रामपंचायत,ठेकेदार, गावातील यांचे नाते संबंधी,सन २०२२ मध्ये जी यादी लावण्यात आली होती त्या यादी तील दोन नंबरचे उमेदवार, त्यांचे नातेवाईक व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सगळ्यांनी मिळून प्लॅन करून क्रांती शिंदे यांना टार्गेट करून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी क्रांती शिंदे यांना घाटजवळा अंगणवाडीतून अंगणवाडी सेविका पदावरून कमी करण्यात आले. वरील दोन्ही विषयांमध्ये तात्काळ सखोल चौकशी व्हावी. योग्य त्या व्यक्तीला नियुक्ती पत्र द्यावे. क्रांती शिंदे या महिलेला तात्काळ घाटजवळा अंगणवाडी मध्ये अंगणवाडी सेविका पदावर रुजू करून घ्यावे. व यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ या विषयाची चौकशी करा. प्रकरणी संबंधित अधिकारी यांच्या वर योग्य ती कारवाई करण्यात यावी व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे.

अशी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे अन्यथा आंदोलनकर्ते जिल्हाधिकारी यांच्या गाडीला आडवं झोपुन न्याय घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाहीत.

# जालना जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळांमध्ये नववीच्या वर्गांना मान्यता

**जालना/असलम कुरेशी**

जालना जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता नववीचे वर्ग सुरु करण्याची पालकांची व शिक्षक संघटनांची अनेक दिवसापासून मागणी होती. अखेर बुधवारी ही मागणी पूर्ण झाली असून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता नववीचे वर्ग सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासंदर्भात अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अब्दुल्ला चाऊस यांनी सांगितले की अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटने तर्फे पात्र शाळांना वर्ग ९ वी व १० वी संलग्न करण्याबाबत मागील दोन वर्षापासून पाठपुरावा सुरू होता. त्या अनुषंगाने मागील महिन्यापासून पुन्हा सतत पाठपुरावा करून जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून सकारात्मक अहवाल पाठविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. शेवटी काल संचिका स्वतः समोर बसून परिपूर्ण प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रशासनाने सादर केल्याच्या अनुषंगाने आज मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशाला परतूर व प्रशाला जामखेड वगळून आलेल्या सर्व प्रस्तावांना मान्यता देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी एक ऐतिहासिक भेट दिली आहे. या कामी संघटनेचे सर्व पदाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना, शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, कक्ष अधिकारी केशपागे, वरिष्ठ सहाय्यक रवी साळवे यांचे सर्व विद्यार्थी, पालक वर्ग, अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटने तर्फे विशेष आभार व धन्यवाद मानन्यात आले. यासंदर्भात अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान यांनी सांगितले की जालना जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता ९ वीचे वर्ग सुरु करण्याबाबत माजी आरोग्यमंत्री तथा आमदार राजेशभैय्या टोपे यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा मीना मॅडम व शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांच्यासोबत चर्चा करुन इयत्ता ९ वी वर्गासाठी मान्यता मिळविण्यासाठी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने मागील काही महिन्यांपासून सतत प्रयत्न व पाठपुरावा सुरू होता. तसेच काल संध्याकाळी व आज सकाळी आमदार राजेशभैय्या टोपे यांनी स्वतः मुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा मीना मॅडम व शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांच्याशी चर्चा करुन पाठपुरावा केला. आज संध्याकाळपर्यंत पत्र निर्गमित करण्याबाबतचे आश्वासन जालन्याचे कर्तव्यदक्ष शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांनी दिले होते. त्यानुसार दातखीळ यांनी अत्यंत तत्परतेने मुस्लिम समाजाच्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी व उज्ज्वल भवितव्यासाठी सर्व कार्यवाही पूर्ण करून आज संध्याकाळी जालना जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा मीना मॅडम यांनी ९ वी चे वर्ग सुरु करण्याबाबत स्वाक्षरी करून आदेश निर्गमित केले. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी या सर्व प्रक्रिया अत्यंत तत्परतेने व जलदगतीने पार पाडण्यासाठी मुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा मीना मॅडम, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, विनया वडजे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष भालेराव, कक्ष अधिकारी केशपागे, वरिष्ठ सहाय्यक रवी साळवे यांचे जालना जिल्ह्यातील सर्व पालक, विद्यार्थी व अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने आभार मानन्यात आले.



## रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांची जयंती साजरी

**जालना/प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत पद्मभूषण बद्रीनारायण बारवाले यांची पुण्यतिथी व गोविंदभाई श्रॉफ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शालेय समिती अध्यक्ष नानासाहेब देशमुख हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून शालेय समिती सदस्य प्रेमचंद भंडारी, डॉ सिद्धिविनायक देशपांडे, शाखा सभासद बळवंतराव देशमुख, मुख्याध्यापक मधुकर बिरहारे यांची उपस्थिती होती.



सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते कै.गोविंदभाई श्रॉफ व कै. बद्रीनारायण बारवाले यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु.वैष्णवी सांगळे हिने केले. याप्रसंगी विद्यार्थिनी कु.कोमल शेळके, कु.अपेक्षा जाधव, आबेद सय्यद यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात मुख्याध्यापक मधुकर बिरहारे, नानासाहेब देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते इयत्ता दहावी ब च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गोविंदभाई श्रॉफ यांच्या जीवनावर आधारित भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अनुजा मोरे हिने तर आभार प्रदर्शन कु.प्रियंका चाटे हिने केले.

## ओबीसी योद्धा प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे याचे चौसाळा शहरात जंगी स्वागत

**बीड/प्रतिनिधी**



ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे नेते प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ(आबा) वाघमारे हे चौसाळा शहरात आले असता त्यांचे ओबीसी बांधवांनी जंगी स्वागत केले यावेळी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रा. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे मागील दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ते यातून संवाद साधत ओबीसी बांधवांमध्ये जनजागृती करत आहेत त्यांच्या आगमना निमित्त ठिकठिकाणी रॅली,संवाद सभा आयोजित करण्यात येत आहे. बधवारी दिनांक २४ रोजी प्रा. लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे यांचे चौसाळा शहरात आगमन झाले. यावेळी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात ओबीसी बांधवांनी त्यांचे जंगी स्वागत केले यावेळी प्रा. हाके यांनी समाज बांधवांशी संवाद साधला यावेळी सावता परिषदेचे बीड तालुका अध्यक्ष प्रा.सुधीरे चौधरे,अशोक निनाळे,सुरेश लिंगे,अभिजित खतिले,अमोल कळसकर,इंजि.राहुल चौधरे,अशोक तोडकर,दिनेश चौधरे,राम खतिले,बबन निनाळे,सुनिल चौधरे यांच्यासह ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गेल्या आठवडाभरा पासून केज तालुक्यात संततधार पाऊस!रिमझिम पावसामुळे जनजीवन विस्कळति तर पशुधनावर उपासमारीची वेळ! (खरिपाच्या पिकांना धोका होण्याची शक्यता!)

केज/प्रतिनिधी

या वर्षी जुन महिन्यातील मृग नक्षत्रात पडलेल्या पावसामुळे शेतकरी राजाने धामधुमीत पेरण्या केल्या. तसे पहाता आत्तापर्यंत एकही मोठा पाऊस झाला नसल्याने या रिमझिम पावसाने पिके मात्र जोमदार आली आहेत. परंतु गेल्या आठवडा भरापासून केज तालुक्यात रिमझिम आणि संततधार पाऊस पडत असल्याने पाणी जमिनीच्या बाहेर न जाता जमिनीतच मुरल्याने जमिनीतील पाण्याची पातळी वाढली आहे.आणि ढगाळ आणि बाष्पयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे ही जोमदार आलेली पिके आता पिवळी पडण्याची शक्यता असुन शेतकरी राजाच्या चिंतेत भर पडल्याचे दिसून येत आहे. या बाबत अधिक माहिती अशी की या वर्षीचा मानसुन अगदी वेळेवर आला. मात्र हा पाऊस जरी मोठा पडला नसला तरी पेरणी योग्य झाल्याने बळीराजाने हि संधी न सोडता अगदी पुर्वी प्रमाणे मृग नक्षत्रात पेरणी केली. यांत्रिक अवजारामुळे हि पेरणी वेळेवर झाली. आणि पिकेही जोमदार आली. मध्यंतरीच्या काही दिवसात पावसाने ओढ दिली होती.यावेळी मात्र बऱ्याच महसूल मंडळात सोयाबीन पिकावर अळीचा प्रादुर्भाव झाला होता.तसे केज



तालुक्यात परणोयाग्य एकुण क्षेत्र १ लाख ५ हजार हेक्टर असुन त्यापैकी एकुण ९३ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे .यामध्ये ८५ हजार हेक्टरवर सोयाबीन पिकाची पेरणी झाली असून कापूस पिकाचे फक्त २२ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. गेल्या वर्षी ४ हजार हेक्टरवर कापूस पिकाची लागवड करण्यात आली होती. केज तालुक्यात ८.५ हजार हेक्टरवर ऊसाची लागवड होती. परंतु पावसाच्या अत्य अल्प प्रमाणामुळे उत्पन्नात झालेली घट लक्षात घेवुन शेतकऱ्यांनी यु.वडगाव आणि बनसारोळा या महसूल मंडळात ५० % ऊस पिक काढुन टाकल्याने आता सध्या ४.५ हजार हेक्टरवर सध्या ऊस लागवड आहे. त्यामुळे पेरणी क्षेत्रात वाढ झाली आहे. तर सध्या केज तालुक्यात रिमझिम आणि संततधार पाऊस सुरू असला तरी अद्याप नद्यांना पाहिजे तसे पाणी आलेले नाही. गेल्यावर्षीच्या तुलनेत या वर्षीचा आत्तापर्यंतचा पाऊस सरासरी पेक्षा जास्त असुन हा पाऊस पिकासाठी चांगला असल्याचे मत केज तालुका कृषी अधिकारी पठाडे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे. तर हा पाऊस काही दिवस असाच सुरु राहिला तर मात्र सोयाबीन पिके पिवळे पडुन या पिकाला धोका निर्माण होऊ शकतो.असेही त्यांनी सांगितले आहे.तर या रिमझिम आणि संततधार पावसामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाल्याने सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत.तर पशुधनावर मात्र उपासमारीची वेळ आली आहे.

## सय्यद अज़मत अली यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार




जालना/असलम कुरेशी

इंटरनॅशनल हुमन राईट अंबेसिडर ऑर्गनारझेशन तर्फे दिला जाणारा मानाचा पुरस्कार आयडियलस ऑफ भारत अवार्ड युथ महाराष्ट्र गौरव पुरस्कार (उद्योजक घटकातून) अप्लायन्सर उद्योग समूह प्रायव्हेट लिमिटेड औरंगाबादचे सय्यद अजमत खुदरत अली यांना मिळाला असून नुकताच एका कार्यक्रमात सय्यद अज़मत अली यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सय्यद अज़मत अली यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## बीड जिल्ह्यत नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करा-खा.बजरंग सोनवणे

**बीड/प्रतिनिधी**

जिल्ह्यतील आष्टी/पाटोदा तालुक्यासह इतर तालुक्यातही अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्याची लेखी निवेदनातून मागणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शेतकरी पुत्र खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यतील आष्टी/पाटोदा तालुक्यासह इतर तालुक्यातही मागील दोन तीन दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे व सततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा, उडीद, मुग, सोयाबीन, पिकांबरोबर इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले



आहे. तरी या झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळून देण्याकरिता सुयोग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी अशी लेखी निवेदनातून मागणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शेतकरी पुत्र खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077